# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक ३१९/२०२४ दिनांक- २१/०८/२०२४.

## "घरफोडी चोरी करणाऱ्या आरोपींना अटक करुन मुद्देमाल हस्तगत करण्यात नालासोपारा पोलीसांना यश"

दिनांक २४/०७/२०२४ सकाळी ०७.०० वा. ते १०.३० वाजताचे दरम्यान रुम नं.सी ००२, जय अपार्टमेन्ट, राहुल इन्टरनॅशनल स्कुल शेजारी, नालासोपारा प., ता. वसई, जि. पालघर येथे यातील फिर्यादी व त्यांचे कुटुंबातील सदस्य घरी नसतांना त्यांनी घराचा दरवाजा कडी कुलुप लावुन बंद केलेला असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे राहते घराचे लॉक असलेले कुलुप कशाचे तरी सहाय्याने तोडून घरात प्रवेश करुन घरातील बेडरुममधील लोखंडी कपाटातील ८६.९८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तसेच चांदीचे पैजण व लहान मुलीचे कमरेची चैन, १०,०००/- रुपये रोख रक्कम असे ४,२१,६४०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीचे इरादयाने चोरी करुन चोरुन नेले आहेत. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन नालासोपारा पोलीस ठाणेस गु.र.क्र. I २७६/२०२४, कलम ३०५(अ),३३१(३) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

नालासोपारा पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये गेल्या काही दिवसांपासुन घरफोडी चोरींचे प्रमाण वाढल्याने परिस्थीतीचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. सदर गुन्हयाचे घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तसेच गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने तपास करण्याचा प्रयत्न केला. परंतू काहीएक माहीती हाती लागली नाही. त्यामुळे कोणीतरी बिल्डींगच्याच कोणत्यातरी व्यक्तीने चोरी केली असल्याचा दाट संशय निर्माण झाला. त्याप्रमाणे फिर्यादी यांचेकडे गुन्हयाचे अनुशंगाने वारंवार चौकशी करुन बिल्डींग मधील संशयीत व्यक्तींकडे चौकशी करण्यास सुरुवात केली.

सदर गुन्हयाचे तपासात फिर्यादी यांचे शेजारी राहणारी आरोपीत महीला नामे सौ. निधी भावेश माळी वय २७ वर्षे, रा.ठी. रुम नं. ०४, सी विंग, सिध्दीविनायक बिल्डिंग, जय अपार्टमेंट, पाटणकर रोड, नालासोपारा पश्चिम हिचेकडे पोलीस तपासाचे सर्व मार्गांचा अवलंब करुन बुध्दी चातुर्याने कौशल्यपूर्ण तपास केला असता, तीने सदरचा गुन्हा केल्याची कबूली दिली. तसेच गुन्हयातील काही दागिने तीचा मित्र प्रविण महादेव रोकडे, रा.ठी. ए/२०२, निर्माण विकास सोसायटी, बीएमसी ऑफीसजवळ, नालासोपारा पश्चिम जि- पालघर याचेकडे देऊन ते दागिने मुथ्थुट फायनान्स कंपनीत ठेवून त्यावर पैसे उचलल्याचे दिसून आले. सदर गुन्हयात निष्पन्न झालेली आरोपीत महीला नामे सौ. निधी भावेश माळी वय २७ वर्षे व प्रविण महादेव रोकडे यांना सदर गुन्हयात दिनांक १५/०८/२०२४ रोजी १७:१९ वा अटक करुन त्यांचेकडे केलेल्या तपासात गुन्हयातील

८६.९८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तसेच चांदीचे पैंजण व लहान मुलीचे कमरेची चैन व १०,०००/- रुपये रोख्र रक्कम असा एकूण ४,७६,३३४/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

वर नमूद गून्हयाचा तपास सपोनि/राजेद्र चंदनकर, नालासोपारा पोलिस ठाणे मि.भा.व.वि.पोलीस आयूक्तालय हे करित आहेत.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, राजेंद्र लगारे, सहायक पोलीस आयुक्त नालासोपारा यांचे मार्गदर्शनाख्राली विजयसिंह बागल, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नालासोपारा पोलीस ठाणे, सपोनि/राजेंद्र चंदनकर, पो.उपनिरी./योगेश मोरे, सफौ/हिरालाल निकुंभ, पोहवा/किशोर धनु, प्रशांत साळुंके, अमोल तटकरे, पो.अं./कल्याण बाचकर, राजेश नाटुलकर, प्रेम घोडेराव, बाबासाहेब बनसोडे, प्रताप शिंदे यांनी केलेली आहे.

**---------00000----------**